अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील श्री. डी.बी. सप्रे यांची कृषि सह संचालक पदावर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि २४१९/प्र.क्र.४२ /१५अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई -३२.
तारीख: २२ ऑगस्ट, २०१९

**संदर्भ :- सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. ईएसबी-१११९/प्र.क्र.४४/१३, दि. १५.०५.२०१९.**

**शासन निर्णय :-**

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन पत्रान्वये केलेल्या शिफारशीनुसार अधिक्षक कृषि अधिकारी (वेतनश्रेणी रू. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००, ६ व्या वेतन आयोगानुसार) संवर्गातील खालील अधिकाऱ्याला कृषि सह संचालक (वेतनश्रेणी रू. १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००, ६ व्या वेतन आयोगानुसार) या संवर्गात सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने पुढील अटींच्या अधीन राहुन निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव व पदनाम | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|
| १ | श्री. दादाराम बाबा सप्रे, अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक, पुणे | कृषि सहसंचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे. |

२. सदर पदोन्नती ही मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि. ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खुला प्रवर्गात रिक्त असलेल्या पदांवर ज्येष्ठतेने देण्यात येत आहेत.

३. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

४. सदर पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची राहील व वरीष्ठ संवर्गात ज्येष्ठतेकरिता ती ग्राहय धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ त्यांना मिळणार नाही.

५. उपरोक्त अधिकाऱ्याने त्यांचा सध्याच्या पदाचा पदभार विभागातील निकटतम ज्येष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवून तात्काळ पदोन्नतीच्या पदावर रूजू व्हावे.

६. आयुक्त (कृषि ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२२१७३६२२२००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.08.22 17:41:34 +05'30'

**( सु. सं. धपाटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
९. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ( व्दारा आयुक्त (कृषि) पुणे )
१०. संचालक, वसंतराव नाईक कृषि व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था, (वनामती) नागपूर.
११. सर्व सह सचिव/उप सचिव ( कृषि ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. उप सचिव (का.१३/ का.१६-ब), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व विभागीय कृषि सह संचालक/अधिक्षक कृषि अधिकारी ( व्दारा आयुक्त (कृषि) पुणे )
१४. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
१५. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी ( व्दारा आयुक्त (कृषि) पुणे )
१६. सर्व संबंधित अधिकारी ( व्दारा आयुक्त (कृषि) पुणे )
१७. निवड नस्ती /१५अे

**प्रतिलिपी,**

१८. मा.मंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१९. मा.राज्यमंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२०. मा. सचिव ( कृषि ) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.